e-ISJN: A4372-3088
p-ISJN: A4372-3089

ISSN: 2394-3122 (Online)
ISSN: 2394-6253 (Print)
Impact Factor: 6.03

Volume 11, Issue 12, December 2024
SK International Journal of Multidisciplinary Research Hub
Journal for all Subjects
Research Article / Survey Paper / Case Study
Published By: SK Publisher
(www.skpublisher.com)

*A Monthly Double-Blind Peer Reviewed Refereed Open Access Multidisciplinary & Multilingual International Journal*
Special Issue: Two Day National Interdisciplinary Conference on "Script Writing"
Organised by: Department of Languages, Shankarlal Khandelwal Arts, Science & Commerce College, Akola, Maharashtra 444002.
(Sponsored by Pradhan Mantri Uchchatar Shiksha Abhiyan Grants to Strengthen Colleges)

# नाट्यसंहिताच्या दृष्टीने अभिज्ञान शाकुंतलातील प्रवेशक, विष्कम्भक आणि मिश्रविष्कम्भकाचा अभ्यास

**सुनिल एस. खरवडे**[१]
शोध विद्यार्थी, संस्कृत विभाग,
शंकरलाल खंडेलवाल कॉलेज,
अकोला

**डॉ. जयश्री अ. सकळकळे**[२]
मार्गदर्शक, सहाय्यक प्राध्यापक,
संस्कृत विभाग,
शंकरलाल खंडेलवाल कॉलेज, अकोला

DOI: https://doi.org/10.61165/sk.publisher.script.writing.2024.57

**प्रस्तावना:**

नाट्यं भिन्नरूचेर्जनस्य बहुधाप्येकं समाराधनम्।[1]

संस्कृत साहित्य मध्ये नाटकाची बीजे वेद रामायण महाभारत इत्यादी ग्रंथांमध्ये पाहायला मिळतात .नाट्यसंहिताचा शास्त्रशुद्ध अभ्यास भरतमुनिंनी आपल्या नाट्यशास्त्र या ग्रंथांमध्ये सांगितला आहे .तसेच अभिनवगुप्तलिखित अभिनभारती , विश्वनाथाचे साहित्य दर्पण धनंजय ,चे दशरुपक ,भावप्रकाशन :इत्यादी नाट्यशास्त्राच्या दृष्टीने प्रसिद्ध ग्रंथ आहेत . नाट्यशास्त्रामध्ये अलंकारनायि ,नायक ,सादरीकरण ,रस ,का ,पंचसंधी ,कथानक ,अर्थोपक्षेपक इत्यादी घटकांचा समावेश होतो कथानक व सादरीकरणाच्या दृष्टीने अर्थोपक्षेपकाचे महत्व अधिक आहे .संस्कृत साहित्यामध्ये अनेक कवींनी नाटकांची रचना केली त्यात महाकवी कालिदासाचे नाव प्रथम स्थानी घेण्यात येते याचे कारण त्यांच्या जगप्रसिद्ध कलाकृती .

पुरा कवींना गणनाप्रसंगे कनिष्ठिकाधिष्ठित कालिदासः।
अद्यापि तत्तुल्यकवेरभावादनामिका सार्थवती बभूव।।'[2]

पूर्वी श्रेष्ठ कवींची मोजणी कनिष्ठिकेपासून सुरवात केली .कालिदासाच्या तोडीचा कवी शोधूनही दुसरा सापडला नाही म्हणुन दुसरे बोट अनामिका हया नावाने प्रसिद्ध झाले .

© 2024, SK Publisher All Rights Reserved

**शोधनिबंधाचा हेतू-**

नाट्यशास्त्रीय ग्रंथांमध्ये प्रतिपादित केलेल्या अर्थोपक्षकातील प्रवेशक ,विष्कम्भक आणि मिश्रविष्कम्भकाचा उपयोग नाट्यसंहिता लिहितांना लेखकाला होतो .रंगमंचावर सादर करावयाची नाट्यसंहिता जी कमी कालावधीमध्ये सादर करायची असते , तेव्हा प्रवेशक ,विष्कम्भक आणि मिश्रविष्कम्भकाच्या वापराने ती पूर्ण करता येऊ शकते अनेक .घटना ज्या रंगमंचावर दाखवणे शक्य होत नाही जसे की दूरचा प्रवास ,युद्ध ,वस्त्रपरिधान यांचे अर्थोपक्षेपकाच्या मदतीने सूचन करण्यात येते. महाकवी कालिदासाचे जगप्रसिद्ध नाटक अभिज्ञानशाकुंतलम् या नाटकांमध्ये सांगितलेला प्रवेशक विष्कम्भक आणि मिश्रविष्कम्भकाचा अभ्यास हा या संशोधनपत्राचा मुख्य हेतू आहे .

- **अर्थोपक्षेपकाचा अर्थ -**

जे अर्थाला उपस्थित करते त्याला अर्थोपक्षेपक म्हणतात .अर्थाचे उपक्षेपण करणे म्हणजे सूचन करणे .नाटकाच्या सादरीकरणात रंगमंचावर वेळेच्या मर्यादेने ,तांत्रिक अडचनिणे ,नाटकामध्ये निरस्ता येणे या कारणाने प्रत्येक गोष्ट सादर करता येत नाही .तेव्हा त्या गोष्टींचे अर्थोपक्षेपकाच्या सहायाने सूचन करण्यात येते.

- **अर्थोपक्षेपकाचे महत्व-**

अङ्केष्वदर्शनीया या वक्तष्यैव च संमता।

या च स्थाद्वर्षपर्यनतं कथा दिनद्वयादिजा।।

अन्या च विस्तरा सूच्या साथौपक्षेपकैर्बुधैः।[3]

नाटकाची निर्मिती करताना कवीने ही गोष्ट लक्षात घ्यावी की अशी एखादी घटना जी रसाच्या दृष्टीने अंकामध्ये सांगण्यास अयोग्य आहे पण दोन अंकाच्या कथानकाला जोडण्याच्या दृष्टीने महत्वाची आहे .त्या घटनेच सूचन अर्थोपक्षेपकाने करावे .ज्यात दोन दिवसापासून तर एक वर्षाचा काळ जे रंगमंचावर दाखवणे सोयीचे नाही त्याचे सूचन करावे.

- **अर्थोपक्षेपकाची संख्या -**

अर्थोपक्षेपकैः सूच्यं पञ्चभिः प्रतिपादायेत् ।[4]

अर्थोपक्षेपकाची संख्या एकूण पाच सांगितली आहे .

- **अर्थोपक्षेपकाची नावे -**

अर्थोपक्षेकाः पञ्च विष्कम्भकप्रवेशकौ ।

चूलिकाङ्काऽवतारोऽथ स्यादङ्कमुखमित्यपि॥[5]

1) विष्कम्भक

2) प्रवेशक

3) चूलिका

4) अंकावतार

5) अंकमुखम्

1.विष्कम्भक-

**वृत्तबर्तिष्यमाणानां कथांशानां निदर्शकः।**

**संक्षिप्तार्थस्तु विष्कम्भ आदाबहुस्य दर्शितः।**[6]

विष्कम्भक घडलेल्या आणि घडणाऱ्या कथानकाचे सूचन करते.विष्कम्भक हे अंकाच्या तुलने छोटे असते. विष्कम्भकाचा उपयोग नेहमी अंकाच्या सुरुवातीलाच करतात.

1.1 विष्कम्भकाचे प्रकार.

मध्येन मध्यमाभ्यां वा पात्राभ्यां संप्रयोजितः।

शुद्ध स्यात्स तु संकीर्णो नीचमध्यमकल्पितः।।[7]

विष्कम्भकाचे दोन प्रकार आहे शुद्ध विष्कम्भक, मिश्र विष्कम्भक असे आहेत.

1.1.1 शुद्ध विष्कम्भक

एक किंवा दोन मध्यम प्रकृतीचे पात्र जे घडलेले आणि घडणाऱ्या घटनेचे सूचन करतात. यात संस्कृत भाषेचा उपयोग होतो.

1.1.2 मिश्र विष्कम्भक

यात मध्यम प्रकृती आणि नीच प्रकृतीचे पात्र घडलेल्या आणि घडणाऱ्या कथानकाचे सूचन करतात यात संस्कृत आणि प्राकृत भाषेचा उपयोग होतो.

2. प्रवेशक

तद्वदेवानुदात्तोक्त्या नीचपात्रप्रयोजितः।

प्रवेशोऽङ्कद्वयस्यान्तः शेषार्थस्योपसूचकः ।।[8]

एक किंवा अनेक अधमप्रवृत्तीच्या पात्रांकडून झालेल्या आणि होणाऱ्या कथानकाचे प्राकृत भाषेत सूचन असते.

**अङ्कान्तरानुसारी सङ्क्षेपार्थमधिकृत्य बिन्दूनाम् ।**

**प्रकरणनाटकविषये प्रवेशको नाम विज्ञेयः ॥**[9]

प्रवेशक हे प्रकरण आणि नाटक यांच्या दोन अंकाच्या मध्ये उपयोजिले जाते .प्रवेशक नेहमी नीच प्रकृतीच्या पात्रांकडून सादर केले जाते. विष्कम्भक आणि प्रवेषक यांच्यामध्ये एक प्रमुख फरक हा भाषेचा आहे .विष्कम्भका मध्ये संस्कृत आणि प्राकृत भाषेचा वापर होतो .तर प्रवेशकामध्ये केवळ प्राकृत भाषेचाच प्रयोग होतो .

**3चूलिका**

अन्तर्यवनिकासंस्थैः.सूतादिभिरनेकधा।

अर्थोपक्षेपणं यतु क्रियते सा हि चूलिका।। [10]

नेपथ्यामधून रहस्यपूर्ण घटनेची सूचना सूत इत्यादी पात्रांकडून देण्याला चूलिका म्हणतात.

**4. अंकावतार**

अङकान्ते सूचितः पात्रैस्तदङकस्याविभागतः।

यत्रङकोडवतरत्येषोङ्कावतार इति स्मृतः।।[11]

अंकावतर या अर्थोपक्षेपकाचे कार्य हे अंकाच्या शेवटी त्याच अंकाच्या पात्रांद्वारे पुढील अंकाच्या कथानकाची सूचना करणे असते.

**5. अंकमुखम्**

विश्लिष्टमुखमङकस्य स्त्रिया वा पुरूषेण च।

यदुपक्षिप्यते पूर्वे तदङकमुखमुच्येते।।[12]

अंकमुखांमध्ये स्त्री किंवा पुरुष पात्रांद्वारे अंकाच्या सुरुवातीलाच पुढे होणाऱ्या घटनांचे संक्षिप्त सूचन केले जातेण्

❖ जगप्रसिध्द नाटक अभिज्ञानशाकुंतलम् नाटकातील विष्कम्भक आणि प्रवेशक .

महाकवी कालिदासाचे 7 अंकी शृंगार रस प्रधान जगप्रसिद्ध नाटक अभिज्ञानशाकुंतलम नाटकामध्ये भरत मुलीने सांगितलेला अर्थोपक्षपकांचा प्रयोग कालिदासाने स्वतःच्या कवी कौशल्याच्या बडावर अधिक मनोरंजक आणि न्यायिक पद्धतीने केला आहे यात हस्तीनापुरचा .राजा दुष्यंत कण्वमुनीची मानस कन्या शकुंतला यांच्या प्रेमाची कथा वर्णिली आहे ,दोघांचा कण्वमुनीच्या आश्रमात गांधार विवाह ,दुष्यंत हस्तीनापुरला परत आल्यानंतर दुष्यंताच्या विरहात जगणारी शकुंतला , दुष्यंताच्या आठवणीत मग्न असताना दुर्वासा ऋषी कडून मिळालेला शाप ,जगाच्या कल्याणासाठी दुष्यंताचे तेज शकुंतलेने स्वतःच्या उदरात धारण केले ,शकुंतलेला सासरी पाठवणीचा प्रसंग शापाच्या ,प्रभावाने दुष्यंतला पडलेला शकुंतलेचा विसर ,

स्वतःच्या अस्तित्वासाठी शकुंतलेची लढाई ,शेवटी मारीच मुनीच्या आश्रमात दुष्यंत शकुंतला आणि यांचा मुलगा सर्वदमन यांची भेट आदी घटनांचा समावेश होतो.

शाकुन्तलाच्या - थ्या अंकाच्या आरंभीस असणारा मिश्रविष्कम्भक 4 ऱ्या अंकाच्या आरंभी असणारा विष्कम्भक व 3

- ‘शकुंतलेला झालेली उष्णबाधा ’या प्रियंवदेच्या वाक्यातून दुष्यंतच्या प्रेमात व्याकूळ झालेल्या शकुंतलेची अवस्था जी रंगमंचावर दाखवणे योग्य नाही ती विष्कम्भकाच्या माध्यमातून कालिदासाने सांगितली आहे हे विष्कम्भक तिसऱ्या अंकाच्या सुरुवातीला वापरले आहे.
- रंगमंचावर विवाह प्रसंग दाखवणे शक्य नाही म्हणून केवळ अनुसयाच्या द्वारे शकुंतला आणि दुष्यंत यांचा गांधार विवाह झाला व ती गर्भवती आहे राजा कार्य समाप्त ,झाल्यामुळे आपल्या राजधानीला परत गेला आहेत्याच्याकडून काहिही , उःशाप आणि तो कुणालाही न सांगण्याचा अनसूया आणि प्रियंवदेचा निर्णय ,दुर्वासांचा शाप ,वार्ता नाहीयाचे सूचन हे चौथ्या अंकाच्या सुरुवातीला वापरले आहेया मिश्रविष्कम्भकात अनेक महत्त्वाच्या घटना घडता .तनाटकाच्या यशामध्ये . दुष्यंत .त्यामुळे हा मिश्रविष्कम्भक अतिशय महत्त्वाचा आहे .याचा मोलाचा भाग आहेशकुंतलेला विसरेल की काय या शंकेचे सूचन पुढील विष्कम्भकात देते .
- दुर्वासा ऋषीचा शाप हा कथानकाला वेगळीच कलाटणी देणारा आहे नाटकामध्ये रंजकता निर्माण करणार आहे हा शापप्रसंग या मिश्रविष्कम्भकात येतो.

विचिन्तयन्ती यमनन्यमानसा तपोधनं वेत्सि न मामुपस्थितम्।

स्मरिष्यति त्वां न स बोधितोऽपि सन् कथां प्रमत्तः प्रथमं कृतामिव।।[13]

- ज्याचं एकाग्र चित्ताने ध्यान करीत असल्यामुळे दाराशी आलेल्या माझ्यासारख्या तपस्व्याला तू ओळखत नाही ,त्याला आठवण करून दिली तरी मद्यपानांने धुंद झालेल्या माणसाला पूर्वी उच्चारलेल्या शब्दाची जशी आठवण राहत नाही तशी तुझी आठवण त्याला राहणार नाही .असा शाप हा कालिदासाच्या प्रतिभेचा स्वतंत्र आविष्कार आहे .रंगमंचावर दुर्वासा ऋषी न दाखवता विष्कम्भकाच्या द्वारे रंजकता निर्माण केली आहे .या विष्कंभकामध्ये भयरस व अद्भूत रस आहे .दुर्वासा ऋषीच्या क्रोधीत स्वभावाचे सूचना या विष्कम्भकात केले आहे .दोन्ही मध्यम प्रकृतीची पात्र असल्यामुळे हे विष्कम्भक शुद्ध विष्कम्भक आहे.

**व्या अंकाच्या आरंभीचा 6प्रवेशक**

अभिज्ञान शाकुंतलम च्या सहाव्या अंकाच्या सुरुवातीला एक प्रवेशक आला आहे या प्रवेशकामध्ये कोतवाल कोळी आणि पहारेकरी यांचा संवाद आपल्याला दिसतो .यामध्ये कोळ्याला पकडून आणले आहे .त्याच्याजवळ अंगठी आहे आणि मग ती अंगठी कशी सापडली आपण शचीतीर्थामध्ये मासेमारी करतो आणि शचीतीर्थामध्ये एका माशाच्या पोटामध्ये आपल्यालाही अंगठी

SK International Journal of Multidisciplinary Research Hub
Volume 11, Issue 12, December 2024 pg. 282-288

सापडली आणि मग त्याने ती विकायला आणलेली आहे आणि ती विकताना त्याला पहारेकरी पकडतात आणि मग त्याला राजाकडे घेऊन जायचे असते .ती अंगठी घेऊन कोतवाल राजाकडे जातो म्हणजे अशी हकीकत आपल्याला समजते आणि मग अंगठी पाहताच राजाला शकुंतलेची आठवण होते आणि मग राजा कोळ्याला  शिक्षा करण्याच्या ऐवजी त्याला बक्षीस देतो आणि याप्रवेशाद्वारे आपल्याला हे पण समजतं की अंगठी पाहिल्यावर राजा गंभीर झालेला आहे .त्याला काहीतरी आठवले आहेत .तर या प्रवेशकामध्ये आपल्याला अंगठी सापडते ती कशी सापडते आणि ती सापडल्यानंतर ती राजा पर्यंत जाते ही हकिकत आपल्याला या प्रवेशकाच्या माध्यमातून समजते .चौथ्या आणि पाचव्या अंकांमध्ये शाकुंतलाचा गर्भ संधीचा भाग आहे .पाचव्या अंकामध्ये शकुंतला अप्सरसतीर्थाजवळ नाहीशी होते .राजाकडेही नाही ती आश्रमात गेलेली नाही त्यामुळे आता राजाला तिची आठवण आली तरी ती कुठे सापडणार हा प्रश्न अनुत्तरीत आहे .आणि अशा परिस्थितीमध्ये राजाला अंगठी सापडते आणि राजाला शकुंतलीची आठवण येते ही कुठेतरी विमर्श संधीची ही सुरुवात आहे म्हणजे प्रश्न पूर्णपणे सुटलेला नाहीये पण कुठेतरी एक वाट पुढच्या कथानकाला ही मिळालेली आहे आणि त्यामुळे इथून पुढे विमर्श संधीला सुरुवात होते आहे .

वास्तविक पाहता हा जो प्रसंग आहे .हा राजदरबारात दाखवता आला असता तर जास्त प्रभावी झाला असता असा एक प्रश्न रसिकाच्या मनामध्ये येऊ शकतो .पण सहाव्या अंकात शकुंतलेच्या विरहाने राजा दुःखी होतो आहे त्याला शकुंतलेची आठवण येते आहे .त्याचा आणि विदूषकाचे खूप लांबलचक संवादही आहे  .पण हा सगळा प्रसंग राजाच्या अंतःपुरात घडतो .स्वतंत्र प्रवेश हा राजाच्या दरबारामध्ये तो दाखवायला लागला असता म्हणून या प्रवेशकांनी ती हकीकत नुसती प्रेक्षकांपर्यंत पोहोचवून कालिदासाने एक प्रवेश किंवा रंगमंचाची जी एक मर्यादा आहे ती लक्षात घेतली आहे .संवादांची लांबीही वाढली असती हे सगळं टाळण्यासाठी ही मासा आणि अंगठी मिळाल्याची हकीकत कालिदासाने प्रवेशकातून मांडली आहे.

**निष्कर्ष**

प्रवेशक विष्कम्भक आणि मिश्रविष्कम्भक असे अर्थोपक्षेपकातील तीन प्रकार आपल्याला अभिज्ञानशाकुंतलम् या नाटकात पहावयास मिळतात नाटकाचे कथानक वेगवान करण्यासाठी ,अनावश्यक प्रवेश टाळण्यासाठी ,मंचनासाठी  ,सुकरता निर्माण करण्यासाठी ,आणि पुढील सूचना करण्यासाठी अत्यंत प्रभावीपणे कालिदासाने  प्रवेशक ,विष्कम्भक आणि मिश्रविष्कम्भक यांचा प्रयोग आणि उपयोग केल्याचे स्पष्ट दिसते म्हणूनच .कालिदासाच्या अभिज्ञानशाकुंतलमची संस्कृत साहित्यात काव्येषु नाटकं रम्यं तत्र रम्या शकुन्तला।। [14] अशी ओळख आहे.

## संदर्भसूची

१व्याख्याकार ( प्रा .राम शेवाळकर, महाकवी कालिदास ,कृत मालविकाग्निमित्र, प्रसाद प्रकाशनपुणे पेज क्र. (1772

२ .सौ (नीला प्र .सोमलवार, संस्कृत साहित्यातील श्रेष्ठ कवी, कौमुदी प्रकाशन, यवतमाळ पेज क्र26.

(3व्याख्याकारए आचार्य लोकमणि दाहाल साहित्य ,दर्पन, चौखंबा सुरभारती प्रकाशन, वारानसी पेज क्र508 .

(4व्याख्याकार .डॉ ,केशवराव मुसलगॉवकर, श्रीधनजयविरचित दशरूपक चौखंबा ,प्रकाशन :वारानसी,पेज क्र124 .

(5व्याख्याकार आचार्य ,लोकमणि दाहाल, साहित्य दर्पन, चौखंबा सुरभारती प्रकाशन, वारानसी पेज क्र510 .

(6तत्रैव क्र510 .

(7तत्रैव क्र511 .

(8व्याख्याकार, डॉ .केशवराव मुसलगॉवकर, श्रीधनजयविरचित दशरूपक चौखंबा,प्रकाशन, वारानसी पेज क्र126 .

(9व्याख्याकार. श्रीबाबुलाल शुक्लशास्त्री. श्रीभरतमुनीप्रनितम सचित्रम् नाटयशास्त्रम् चौखंबा ,संस्कृत संस्थान, वारानसी अध्याय 21 पेज क्र87 .

(10 तत्रैव अध्याय 21 पेज क्र87 .

(11व्याख्याकार, आचार्य लोकमणि दाहाल, साहित्य दर्पन, चौखंबा सुरभारती प्रकाशन, वारानसी पेज क्र513 .

(12व्याख्याकार, श्रीबाबुलाल शुक्लशास्त्री श्रीभरतमुनीप्रनितम ,सचित्रम् नाटयशास्त्रम्, चौखंबा संस्कृत संस्थान, वारानसी अध्याय 21 पेज क्र88 .

(13व्याख्याकार, श्रीकृष्णमनी त्रिपाठी, अभिज्ञानशाकुन्तलम्, चौखंबा सुरभारती प्रकाशन, वारानसी पेज क्र168 .

(14सौ .नीला प्र .सोमलवार, संस्कृत साहित्यातील श्रेष्ठ कवी, कौमुदी प्रकाशन, यवतमाळ पेज क्र33 .

:::. Cite this article .:::

खरवडे, सुनिल एस. & सकळकळे, डॉ. जयश्री अ. (2024). नाट्यसंहिताच्या दृष्टीने अभिज्ञान शाकुंतलातील प्रवेशक, विष्कम्भक आणि मिश्रविष्कम्भकाचा अभ्यास. Two Day National Interdisciplinary Conference on Script Writing, 282–288.

https://doi.org/10.61165/sk.publisher.script.writing.2024.57